CNRNOMHSN090009042015

**नि.दि.मु.क्र.२०५/२०१५ मधील नि.क्र.४३,४५ व ४७ खालील संयुक्त आदेश**
**(आदेश पारीत दिनांक ०२/०२/२०२३ रोजी)**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.७ व ११ चे वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ करणेसाठी व अबेटमेंटचा आदेश सेटअसाईड होवून प्रतिवादी क्र. ०७ व ११ चे वारस रेकॉर्डवर घेणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी विरुध्द सरस निरस मानाने वाटप होवुन मिळणेबाबत दाखल केला आहे. वादीने त्यांच्या अर्जात असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.०७ राधाबाई रामचंद्र उर्फ रामु कांबळे ही दि.३१.०५.२०२० रोजी मयत झाले आहेत. तिच्या मृत्युपश्चात दाव्यातील प्रतिवादी क्र. ०१ ते ०६ हेच कायदेशीर वारस आहेत. तसेच प्रतिवादी क्र. ११ जनाबाई पांडूरंग सावंत ही दिनांक १७/०२/२०२० रोजी मयत झाली असुन त्यांचे निशाणी क्र.४७ अर्जातील नमुद ११-अ ते ११-क हे मुले व मुली असे कायदेशिर वारस आहेत. तसेच, त्या वारसांना याकामी सामील करणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र.०७ व ११ हे मयत झालेनंतर त्याचे वारस दावेकामी ९० दिवसांत रेकॉर्डवर घेणे आवश्यक होते परंतु, कोरोना कलावधीमध्ये न्यायालयाचे कामकाज बंद असल्यामुळे त्यांना प्रतिवादी क्र. ०७ व ११ यांचे वारस मुदतीत अभिलेखावर दाखल करता आले नाहीत. त्यामुळे दावा प्रतिवादी क्र. ०७ व ११ यांचे वारस घेणेस अबेट झाला आहे. वादीने जाणुनबुजून प्रतिवादीचे वारस रेकॉर्डवर घेणेस विलंब केलेला नाही. म्हणून वादीने वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ होवून अबेटमेंटचा आदेश सेटअसाईड होवून नि.क्र. १ मध्ये प्रतिवादी क्र.०७ हिचे नावावर काट मारुन तिचे नावापूढे मयत वारस प्रतिवादी क्र. १ ते ६ असे नमुद करणेस व प्रतिवादी क्र ११ चे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी वर नमुद सर्व अर्जावर नि.४३ वर संयुक्त म्हणणे सादर करुन वादीच्या अर्जातील कथने नाकारली आहेत व असे अभिकथन केले आहे

की, कोरोना कालावधीनंतर नियमित न्यायालय सुरु झालेनंतरसुध्दा वादी यांनी दिनांक १०/०१/२०२२ रोजी म्हणजेच जवळपास एक वर्षाच्या कालावधीनंतर अर्ज दिलेला आहे. तसेच वादी यांनी त्याचे अर्जात किती विलंब झाला हे नमुद केले नाही. वादी यांनी दाखल केलेले मृत्यूचे दाखले पाहता ते २०२० मध्ये काढल्याचे दिसुन येते. त्यामुळे वादी यांनी याकामी जाणुन बुजून विलंब केल्याचे दिसुन येते. त्यामुळे वादीचे अर्ज रद्द करण्यात यावे व मे. न्यायालय वादीचे अर्ज मंजूर करण्याच्या निर्णयाप्र आल्यास वादी यांना जास्तीत जास्त दंड करण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेख पाहिला. वादी व प्रतिवादीतर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द सरस निरस मानाने वाटप होवुन कब्जा मिळणेकरीता दाखल केला आहे. वादी यांनी प्रतिवादी नं.०७ राधाबाई रामचंद्र कांबळे ही दिनांक ३१.०५.२०२० रोजी मयत झालेबाबत नि.४२/१ कडे मृत्यू प्रत दाखल केली आहे. नि.४२/१ कडील मृत्यू दाखल्याचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.०७ ही दिनांक ३१/०५/२०२० रोजी मयत झाली असल्याचे स्पष्ट होते. तसेच नि.४२/२ कडे प्रतिवादी क्र. ११ जनाबाई पांडूरंग सावंत हिचा मृत्यू दाखला हजर केला आहे. सदर मृत्यू दाखल्याचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र. ११ ही दिनांक १७/०२/२०२० रोजी मयत झाली असल्याचे स्पष्ट होते. याकामी वादीतर्फे वकीलांनी दिनांक १०.०१.२०२२ रोजी नि.४५ अन्वये मयत प्रतिवादी नं.११ जनाबाई पांडूरंग सावंत हिचे वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ करणेकरिता अर्ज दिला होता. वादींनी वारस अभिलेखावर घेणेस जवळपास २ वर्षाचा विलंब केला आहे हे स्पष्ट होते. मुळ दाव्याचे स्वरुप पाहता व दाव्याचा गुणदोषावर निकाल होणेकरिता प्रतिवादी नं.११ जनाबाई पांडूरंग सावंत हिचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. म्हणून वादी यांचा नि.४३ कडील अर्ज विलंब माफीचा अर्ज मंजूर करुन नि.४५ कडील अर्जाप्रमाणे प्रतिवादी नं.११ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश सेटअसाईड करुन नि.४७ प्रमाणे नमुद वारसांना याकामी अभिलेखात सामील करणेत येत आहे. सबब, या निष्कर्षास अनुसरुन मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## :: आदेश ::

१. वादी यांचे नि.४३, ४५ आणि ४७ कडील अर्ज दंड रक्कम रु. ३००/– (रक्कम रुपये तिनशे) प्रतिवादींना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतात.

२. वादी यांनी दंडाची रक्कम प्रतिवादी यांना दिलेनंतर वादी यांनी प्रतिवादी नं. ७ व ११ यांचे वारस अभिलेखात सामील करुन तशी दुरुस्ती दाव्यात करावी व दुरुस्त दाव्याची प्रत १४ दिवसाच्या आत दाखल करावी.

RITA SHESHRAO KULKARNI

Digitally signed by RITA SHESHRAO KULKARNI
Date: 2023.02.03 13:25:12 +0530

**तासगांव.** **(डॉ.आर.एस.कुळकर्णी)**

**दि.०२.०२.२०२३** **सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, तासगांव.**

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईल मधील सर्व मजकूर हा मुळ न्यायनिर्णयातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – श्री. अभय अरविंद रणदिवे |
| न्यायालय | – सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,<br>तासगांव, जिल्हा सांगली. |
| दिनांक | – ०२ फेब्रुवारी २०२३. |
| न्यायीक अधिकारी यांनी सही केलेली दिनांक | – ०२ फेब्रुवारी २०२३. |
| न्यायनिर्णय अपलोड दिनांक | – ०२ फेब्रुवारी २०२३. |